जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

प्रेसनोट क्र. ३०७५ दिनांक २४/०९/२०१९

**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**पोलीस काका यांनी कराटे स्पर्धक विदयार्थ्यांशी संवाद साधलेबाबत.**

दिनांक २४/०९/२०१९ रोजी ११/३० ते १२/०० वा दरम्यान वपोनि. शंकर खटके, चंदननगर पो.स्टे. यांचे सुचनांनुसार पोलीस ठाणेहददीतील राजाराम भिकोबा पाटील स्टेडीयम, खराडी, पुणे मध्ये चंदननगर पोलीस स्टेशन कडील पोलीस काका पोलीस नाईक २६२३, अनिरुध्द जायभाये, पोना रवि आहेर यांनी मिटींगघेऊन मिटींगमध्ये विद्यार्थी त्यांचे शिक्षक यांना तसेच सुरक्षीततेसंबधाने, सायबर गुन्हे, लैंगीक अपराध, रॅगींग यासंबधाने चर्चा करुन मार्गदर्शन केले. त्यांना असलेल्या अडीअडचणीबाबत विचारणा करुन त्यांचे शंका व अडचणीचे निरसन केले. सदर मिटींग दरम्यान त्यांना पोलीस आयुक्तालयामध्ये मुलीसाठी स्थापन केलेल्या पोलीस काका, भरोसा सेलच्या योजनेची माहीती देवुन, योजनेचा उपयोग करुन घेणेसाठी मार्गदर्शन केले. महीलांसाठी १०९१ हेल्पलाईन नंबरबाबत माहीती देऊन त्यावर अडचणी कळविणेबाबत आवाहन केले. अडचणींचे दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं. ०२०/२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं. १०० वर संपर्क सांधुन मदत मागणेसाठी माहिती दिली. सदर ठिकाणी ४०० ते ४५० विदयार्थी व शिक्षक हजर होते.

सदरची चांगली कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक – शंकर खटके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस काका पोलीस नाईक २६२३, अनिरुध्द जायभाये व पोना रवि आहेर यांनी केलेली आहे.



